RNI No. MAHBIL /2009/35527

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार—क

वर्ष ३, अंक ४] शुक्रवार, जानेवारी १३, २०१७/पौष २३, शके १९३८ [पृष्ठे २, किंमत : रुपये ९.००

**असाधारण क्रमांक ४**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाव्यतिरिक्त इतर वैधानिक प्राधिकाऱ्यांनी तयार केलेले (भाग एक, एक-अ व एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले वैधानिक नियम व आदेश यांव्यतिरिक्त इतर) वैधानिक नियम व आदेश ; यात भारत सरकार, उच्च न्यायालय, पोलीस आयुक्त, आयुक्त (राज्य उत्पादन शुल्क), जिल्हादंडाधिकारी व निवडणूक आयोग, निवडणूक न्यायाधिकरण, निवडणूक निर्णय अधिकारी व निवडणूक आयोगाखालील इतर प्राधिकारी यांनी तयार केलेले वैधानिक नियम व आदेश यांचा समावेश होतो.**

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

विधान भवन, मुंबई, दिनांक १३ जानेवारी २०१७.

**अधिसूचना**

क्रमांक १/ड-१५/२०१७.—महाराष्ट्र विधानपरिषद नियमांतील पुढील सुधारणा उक्त नियमांतील नियम २१९ च्या पोट-नियम (३) ला अनुसरून, याद्वारे प्रसिद्ध करण्यात येत आहेत :—

**महाराष्ट्र विधानपरिषद नियमात सुधारणा**

**नियम ४**

**(१) नियम ४ पोट-नियम (२) मधील मजकुराऐवजी पुढील मजकूर दाखल करण्यात येईल :—**

" सभापतींनी अन्यथा निदेश दिला नसेल तर, सभागृहाच्या बैठकी, सामान्यपणे, सोमवार ते शुक्रवार या दिवशी दुपारी १२-०० वाजता सुरू होऊन १४-३० ते १५-०० वाजेपर्यंतच्या अर्ध्या तासाच्या विश्रांती कालानंतर १९-०० वाजता समाप्त होतील.".

**नियम ७०**

**(२) नियम ७० पोट-नियम (२) मधील परंतुकानंतर पुढील परंतुक दाखल करण्यात येईल :—**

" परंतु आणखी असे की, सभापतींना सभागृहाचे अधिवेशन सुरू नसेल तेव्हा आतारांकित प्रश्नांची उत्तरे विधानपरिषदेच्या पटलावर ठेवण्यात आली नसली तरी, ती छापण्याचा, प्रसिद्ध करण्याचा, प्रसृत करण्याचा तसेच सदस्यांना वितरित करण्याचा आदेश देता येईल. त्याबाबतीत सभागृहाच्या पुढील अधिवेशनात पहिल्या सोयीस्कर वेळी अशी अतारांकित प्रश्नांची उत्तरे सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात येतील.".

**उत्तमसिंग चव्हाण,**
सचिव,
महाराष्ट्र विधानपरिषद.

**MAHARASHTRA LEGISLATURE SECRETARIAT**

Vidhan Bhavan, Mumbai, dated 13th January 2017

*NOTIFICATION*

No. 1/D-15/2017.—In pursuance of sub-rule (3) of rule 219 of the Maharashtra Legislative Council Rules, the following amendments to the said rules, are hereby published :—

*AMENDMENTS TO THE MAHARASHTRA LEGISLATIVE COUNCIL RULES*

**Rule 4**

**(1) For the words in sub-rule (2) of rule 4, following words shall be substituted :—**

" Unless the Chairman directs otherwise, the sittings of the House shall ordinarily commence from Monday to Friday at 12-00 hours and conclude at 19-00 hours with a recess of half-an-hour from 14-30 to 15-00 hours.".

**Rule 70**

**(2) After proviso in sub-rule (2) of rule 70, following proviso shall be inserted :—**

" Provided further that, the Chairman may, when the house is not in session, order the printing, publication and distribution of answers to un-starred questions to the members although they are not laid on the Table of the House. In that case, answers to un-starred questions shall be laid on the Table of the House during its next session at the first convenient opportunity.".

UTTAMSING CHAVAN,
Secretary,
Maharashtra Legislative Council.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.